# दुर्लक्षित गगनचुंबी पर्वत - शहीद पँथर भाई संगारे

लेखन- राहुल दासु इंगळे



विकिपीडिया वर आज तुला शोधलं पण त्याने तुझ्याबद्दल माहिती न देता, दलित पँथर या चळवळी बाबत माहिती दाखवली, तु स्वतःच्या नावापेक्षा ज्यालामहत्व दिल तेच त्यांने दाखवल मग त्यात विकिपीडियाची काय चुक.....

ज्या ग्रंथांने जि आज पण लोकांच्या मनातुन जायला तयार नाही ती जात, विषमता, निर्दयता निर्माण केली, ज्याने कित्येक गावा, राज्यात विष उकळवल, कित्येक घराची राखरांगोळी करून त्या घरांना नेस्तानाबुत केल, तराजू प्रमाणेमाणसाला मोजण्यास शिकवल, ज्याने माणसाच्या ह्रदयावर उभ राहुन उड्या घेतल्या त्याला एका महामानवाने रखरखत्या ज्वलंत ज्वालेत टाकुन त्याच्याअंगावरील चामडे खोलवर जाळुन त्याची राख केली पण तो कागदाने जरी नष्ट झालाअसला तरी मात्र त्याच्या प्रेरकाच्या अंगात रक्त म्हणुन धुमसत आहे, आणि हेकुचकामी रक्त आजही कित्येक समाजाच्या चिरकांड्या उडवीत निघत आहेत.

हजारो लोकांच्या ह्रदयाच्या धमन्यांना पिरगुळुन त्यांचा रक्तप्रवाहथांबवुन सुजुन टराटर फाटून जाण्यासाठी एका कुप्रसिद्ध मनुचा पुतळा गुजरातमध्ये उभा केला गेला,

त्या जन्माला आलेल्यामनुच्या पुतळ्याला प्रतीरोध म्हणून महाड येथे त्या मनुच अंत्यसंस्कारकरण्यासाठी १९९९ साली दहनाच अवचित साधल पण ज्याने असंख्य लोकांना मुळापासूनजाळल तो त्याचे जाळण्याचे कर्म कसे विसरणार आणि अश्याच एका झंझावातासमनूने त्या दिवशी गिळंकृत केल.

त्याअग्नी तील मनु अचंबीत झाला असेल तुझा दाहक विस्फोट बघुन , लगेच तुझा फोटोबघितला अंगात पांढरा सदरा त्याला अशोक चक्राची आकार दिलेली बटणं, गळयामध्ये मँग्नेटची माळ, हातात बुध्दाची अंगठी, डोळ्यावर गोल्डन फ्रेमचष्मा , तुझ निखळ विद्रोहात्म्क हास्य, हास्यातुन विद्रोह दिसणारा तु पहिलादिसला.



तुझे कानातुन मेंदूत जाणारे, मेंदूतूनहृदयात जावुन दशधमन्यांव्दारे संपुर्ण शरीरात भ्रमंती करणारे, शरीरातीलरोम नंग्या तलवारी प्रमाणे उठुन बसवणारे आणि रक्त नेत्रामध्ये दिसावे असेप्रतिभाशाली निडर वकृत्व.

तु म्हणत होता " जय भिम के नारे पे , खुन बहेतो बहने दो " आणि खरच तु त्या नार्यावर स्वतःच रक्त जाळल.

कित्येक तरुणांना तु आंबेडकर लक्षात आणुन दिला पण तु गेल्यानंतर तरुणआज भाई म्हणुन गुंड भाईकडे रक्त वाहण्यासाठी प्रवृत्त झाले आहेत.


तुझी जाण्याची शोककळा एेकल्यावर शरीरातील खालेल अन्न गोळाव्हाव, आतडीला पीळ देऊन उदरात यावं, उदरातुन ऊर्ध्व दिशा घेऊन मुखात यावंआणि बाहेर पडताना फक्त लालबुंद रक्त पडाव, आणि हे सांडलेल रक्त सुकलेल्याबेंबीच्या देठातुन अर्भकाप्रमाणे शोषुन जाव आणि नेत्रातून अश्रू म्हणूनलालबुंद रक्त पडाव.

तु अग्नीने होरपळला पण तीखरी अग्नी नव्हती, खरा लावा तूझ्या आत होता आणि तो आता आमच्यात शिलगत आहे, तु रखरख भाजला गेला तरी भाजलेल्या मुखात महामानवाच नाव घट्ट व्रणाप्रमाणेस्थानापन्न होत.

परंतु ते आज परत जन्म देतआहेत त्या कुचकामी मनु अगदाला आणि त्याला सहारा म्हणुन महामानवाला जोडू बघतआहेत, पण प्रतिरोध करण्यासाठी तु नाही.

माझरक्त निघत होत सुक्या बोबंलाच्या रक्ताएवढ खरचटलेल्या जखमातुन आता मात्ररक्त उफाळन्यासाठी मला कारंजा मिळला आहे.ते वाट बघत राहणार आहेत परिवर्तनघडण्याची आणि मि केव्हाच लढाई सुरू केली आहे या देशद्रोहाला गाडण्याची आणिनिघालो आहे दुःख जेथून निर्माण होत

त्याची कारण शोधत ते समुळ नष्टकरण्यासाठी डागडुजी केलेल्या क्रांतीच्या मशाली हाती घेऊन काळ्या पँथरप्रमाणे गुरगुरत तुझ ध्येयं गाठण्यासाठी लढाई सुरू झाली आहे. कारण ......




सम्राट संगारे यांनी म्हटलेल्या खालील ओळी प्रमाण .......

डरकर भाग जाना हमारी फीतरत मैं नही
तुम एक को मारोगे सामने हजार पाओगे,
शहादत तो हमारे खून मैं हे
पँथर कोई दोर नही जो तोडनेसे तूट जाए ,
ये तो फासी का फंदा हैं
डरनामत इस देशके दुश्मनोसे
क्युंकी पँथर अभी जिंदा हैं ...............

---
राहुल दासु इंगळे

